( CNR NO.MHNS130003932022)

नियमित दि. दावा क्र.७७/२०२२
महेमुद शेख ..वि.. शेख इमतियास व इतर

## निशाणी क्र. ४२ खालील आदेश

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र. ७ यांनी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करावा यासाठी केलेला आहे. प्रतिवादी पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. ७ यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ७ दाव्याचे समन्स त्यांना दि. ०२/०९/२०२२ रोजी मिळाले तेव्हापासुन ९० दिवसांपावेतो कैफियत व जबाब दाखल करणे गरजेचे व आवश्यक होते. परंतु प्रतिवादी नं. ७ यांना उच्च रक्तदाब व मधुमेह आजार असुन त्यांना नियमित उपचार घ्यावे लागतात. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचेतील वाद सामोपचाराने मिटविण्याचे प्रयत्न देखील सुरु होते. यासर्व कारणामुळे प्रतिवादी नं.७ मुदतीत त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादी क्र. ७ यांस कैफियत दाखल करण्यास २१० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा हेतुपुरस्पर केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ चा विलंब माफीचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दिले असुन त्यात त्यांनी कथन केले की, प्रतिवादी क्र. ७ यांनी यापुर्वीच नि. क्र. २५ वर त्यांची कैफीयत सादर केलेली आहे. प्रतिवादी क्र. ७ ने पुर्वी दाखल केलेल्या कैफीयतीबाबत मौन

बाळगुन प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज बेकायदेशीर असुन रद्द करावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दि. १९/१०/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ७ यांनी त्यांचे वकीलांमार्फत हजर होवुन नि. क्र. २५ वर कैफीयत आणि सदर कैफीयतीच्या पुष्ठयर्थ नि. क्र. २७ वर कैफीयतीचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. ७ चा कैफीयत दुरुस्तीचा अथवा वाढीव कैफीयतीचा अर्ज नाही. सबब, यापुर्वीची दाखल केलेली कैफीयत काढुन घेता येण्याची अथवा रद्द करण्याची तरतुद दिवाणी प्रक्रिया संहितेत अस्तित्वात नाही. म्हणुन उपरोक्त नमुद कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि. क्र. ४२ खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.02.10 17:25:19 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– १०/०२/२०२५

दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत